५६१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८.
कामगार कल्याण विभाग
जा.क्र. काक/३/कावि/१०६/२०२२
दिनांक – ०४/०८/२०२२

प्रति
मा. सर्व विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

विषय: १. कंपाटी कामगाराचे किमान वेतन दराबाबत संदर्भ : १. मा. आयुक्त सो याचेकडील आदेश क्रमांक - काक/३/कावि/९४/२०२० दिनांक - १२/०२/२०२०.
२. मा. कामगार उप आयुक्त (ग्रा. वि) मुंबई व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम १९४८ यांचेकडील क.ग्रा. वि./कि. वे.अ./वि./२०२२(२)/कार्या-१०/२१८३६ दिनांक ०१/०८/२०२२ रोजीने भत्याचे निर्धारित केलेले दर.

महोदय

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भीय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कामगाराचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणाऱ्या कंत्राटी कामगारामार्फत नेमणेत आलेल्या कंत्राटी कामगाराचे दिनांक ०१/०१/२०२० पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित आले आहे. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्याकरिता प्रसिद्ध होणाऱ्या विशेष भत्याने दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे व त्याचप्रमाणे संबंधित विभागांनी किमान वेतनदराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे. उक्त संदर्भीय क २ अन्वये दिनांक ०१/०७/२०२२ ते ३१/१२/२०२२ या कालावधीतील विशेष भत्याचे दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे

आपला विश्वासू

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८.:

४८७

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कामगार कल्याण विभाग
कुशल / अर्धकुशल / कुशल कामगारांचे वेतन दर खालीलप्रमाणे
(कालावधी – दिनांक ०१/०७/२०२२ ते ३१/१२/२०२२)
मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि९४/२०२० दिनांक १२/०२/२०२० मध्ये नमूद केलेल्या अति व शर्तीस अधीन राहून.
जा. क्र. जा .क्र. काक/३/कावि/९०८/२०२२. दिनांक - ०४/०८/२०२२

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुल वेतन र.रु.(१) | विशेष भत्ता र. रु (२) | एकूण वेतन र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ७०७०.०० | २१०७०.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.००, | ७०७०.०० | २००७०.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ७०७०.०० | १८५७०.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालील प्रमाणे भत्ते देय राहतील .

| अ.क्र. | तपशील | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे ( १+२ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ. (एकूण वेतन र.रु. १५०००/-पर्यनच देय ) | १३% |
| ३ | ई एस आय (१+२+घरभाडे ५% यावर) | ३.२५ % |
| ४ | बोनस (१+२ यावर) | ८.३३% |
| ५ | रजा वेतन (१+२ यावर ) | ५.७७ % |
| ६ | कामगार कल्याण निधी (दर महा) | र. रु. ६/- |
| ७ | सेवाशुल्क (१+२ यावर) अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

वरील प्रमाणे मनपातील सर्व कंत्राटी कामगारांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.